**प्रेसनोट दि. ११.१२.२०२३**

लोकसेवक ॲड. सोमनाथ तातोबा माळी, वय ३६ वर्ष, व्यवसाय – सहाय्यक सरकारी अभियोक्ता, प्रथमवर्ग न्यायालय, सांगली वर्ग-१ यांना २०,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचेविरूध्द दाखल असले केसमध्ये तडजोड घडवून केस लवकर निकाली काढण्यासाठी लोकसेवक ॲड. सोमनाथ तातोबा माळी, वय ३६ वर्ष, व्यवसाय – सहाय्यक सरकारी अभियोक्ता, प्रथमवर्ग न्यायालय, सांगली, वर्ग-१ यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रूपये लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.०८.१२.२०२३ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ११.१२.२०२३ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक ॲड. सोमनाथ तातोबा माळी, वय ३६ वर्ष, व्यवसाय – सहाय्यक सरकारी अभियोक्ता, प्रथमवर्ग न्यायालय, सांगली, वर्ग-१ रा. गणेश कॉलनी मालगाव ता.मिरज जि.सांगली यांनी तक्रारदार यांचेविरूध्द दाखल असले केसमध्ये तडजोड घडवून केस लवकर निकाली काढण्यासाठी २५,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती २०,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच विजयनगर येथील सांगली न्यायालयाचे बाहेर सापळा लावला असता लोकसेवक ॲड. सोमनाथ तातोबा माळी, वय ३६ वर्ष, व्यवसाय – सहाय्यक सरकारी अभियोक्ता, प्रथमवर्ग न्यायालय, सांगली, वर्ग-१ यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून २०,०००/- रूपये लाच रक्कम सांगली न्यायालयाचे बाहेर विजयनगर जाणारे रोडवर पंचांसमक्ष स्विकारून मोटार सायकलवरून निघून जात असताना त्यांना श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील गर्ल्स हायस्कुल व कॉलेज नेमीनाथनगर सांगली येथे रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक ॲड. सोमनाथ तातोबा माळी, वय ३६ वर्ष, व्यवसाय – सहाय्यक सरकारी अभियोक्ता, प्रथमवर्ग न्यायालय, सांगली, वर्ग-१ रा. गणेश कॉलनी मालगाव ता.मिरज जि.सांगली यांचेविरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. विजय चौधरी सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, श्री. विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक, श्री. दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, धनंजय खाडे, अजित पाटील, सलिम मकानदार, रामहरी वाघमोडे, ऋषीकेश बडणीकर, उमेश जाधव, सुदर्शन पाटील, सिमा माने, अतुल मोरे, चंद्रकांत जाधव, विना जाधव, चालक वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(दत्तात्रय पुजारी)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.